निशाणी क्र.४२

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ याचा जबाब.**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – पो. ना. महेश हरिश्चंद्र कचे,

वय – ३९ वर्षे, व्यवसाय– नोकरी,

नेमणूक – पोलीस मुख्यालय, अहिल्यानगर. जि. अहिल्यानगर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. के. साबळे यांचे मार्फत सुरुः–**

१. दि.२३.०९.२०२० रोजी मी नेवासा पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होतो व तपास पथकात काम करीत होतो. तपास पथकामध्ये पो.स.ई. शेवाळे, पो.ना. गायकवाड, पो. कॉ. इथापे, इनामदार असे होते. त्यादिवशी आम्ही सर्वजण पोलीस ठाण्यात हजर होतो. त्यादिवशी पो.नि. ढेरे यांनी आम्हाला एक फोटो दाखवून सांगितले की, सदर इसमाचा हातामध्ये पिस्टल व तलवार घेतलेला फोटो व्हायरल झाला आहे, सदर ठिकाणी जावून आपण कारवाई करावी.

२. पो.स.ई. शेवाळे यांनी दोन पंचांना बोलावून घेतले व त्यांना बातमीची हकीकत सांगून कारवाईसाठी नजीक चिंचोली येथे जायचे असल्याचे सांगितले. त्यावेळी आमच्याकडे रिक्रियेशन वाहन क्रमांक एम.एच. १७ ए.एन. ००५८ हे वाहन होते. त्या वाहनातून आम्ही वरील सर्व पोलीस कर्मचारी व दोन पंच १५.३० वाजता पोलीस ठाण्यातून नजीक चिंचोली येथे जाण्यासाठी निघालो. आम्ही १६.१० वाजता नजीक चिंचोली येथील आरोपी योगेश शिवाजी चावरे याच्या घरी पोहचलो. आम्ही त्याच्या घरासमोर जावून त्याला आवाज दिला असता घरातून योगेश चावरे बाहेर आला. आम्ही त्याला फोटो दाखवून त्याबद्दल माहिती विचारली. तेव्हा त्याने सांगितले की,तो फोटो त्याचाच असून फोटोमधील पिस्टल हा गणेश उगले याचा परवानाधारक पिस्टल आहे. त्याला

तलवारीबाबत विचारणा केली असता त्याने त्याच्या मालकीबाबत काहीही सांगितले नाही व सदरची तलवार त्याने त्याच्या शेडमध्ये ॲन्गलला खोचून ठेवल्याचे सांगितले.

३. आम्ही पोलीस कर्मचारी व पंच आरोपीसोबत त्याच्या शेडमध्ये गेलो. तेथून आरोपीने खोचलेल्या दोन तलवारी काढून दिल्या. दोन्ही तलवारीस ८ इंच लांब पितळी मुठ व ३२ इंच लांब पाते होते. दोन्ही तलवारीस लाकडी म्यान होती व त्यावर "सिरोही तलवार २०१९, ३० वर्ष गॅरन्टी" असे लिहिलेले होते. एका तलवारीस १७ इंच लांबीची पितळी साखळी होती. पो.स.ई. शेवाळे यांनी दोन्ही तलवारींचा पंचांसमक्ष सविस्तर पंचनामा केला. त्यास कागदी लेबल लावून त्यावर दोन पंच व पो.स.ई. शेवाळे यांनी सह्या केल्या. दोन्ही तलवारी सिल केल्या. आम्ही तलवारी व आरोपी ताब्यात घेवून पोलीस ठाण्यात परत आलो. पो.कॉ. इनामदार यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दिली.

४. त्यानंतर पो.स.ई. शेवाळे यांनी आम्हाला सांगितले की, आरोपीसोबत फोटोमध्ये असलेला पिस्टल हा सि.आर.पी.एफ. जवान गणेश गजाबापू उगले याचा होता. त्याची नेमणूक तळोजा, रायगड येथे होती. तो मुळ राहणार गेवराई, ता. नेवासा येथील होता. त्याचा लायसन्स क्रमांक जी.एम.सी.के. १२८५, दिनांक १८.०१.२००९ असा होता. दोन्ही जप्त तलवारी पाहिल्यास मी ओळखू शकतो. आता मला आर्टीकल अ व ब वरील दोन तलवारी दाखवण्यात आल्या. त्या आम्ही आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेल्या तलवारी आहेत. आरोपीचा पोलीस निरिक्षक ढेरे यांनी आम्हाला दाखवलेला फोटो दोषारोपपत्रासोबत जोडलेला आहे. तो आर्टीकल क वर आहे. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर आहे. आर्टीकल क वर

असलेल्या फोटोमधील व आज रोजी न्यायालयात हजर असलेला आरोपी एकच आहे. या घटनेबाबत तपासी अधिकारी यांनी माझा जबाब व पुरवणी जबाब घेतला होता.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे ॲड. ए. टी. आगळे यांच्यामार्फत सुरु.**

५. आम्हाला पो.नि. ढेरे यांनी ०३.०० वाजता कॅबिन मध्ये बोलावले होते. आम्ही आरोपीच्या घरी नेवासा फाटा – पिचडगाव – नजीक चिंचोली या मार्गाने गेलो होतो. आरोपीच्या घरासमोरून आवाज दिला असता घरातून आरोपी एकटाच बाहेर आला. त्यावेळी त्याच्या घरात इतर कोणी हजर होते का याबद्दल मला माहिती नाही. आम्ही आरोपीच्या घरी साधारण एक ते सव्वा तास होतो. त्या कालावधीमध्ये आरोपीच्या घरातून कोणीही आलेले नाही. आरोपीच्या घराशेजारी इतर घरे आहेत.

६. ज्या शेडमधून आरोपीने तलवारी काढून दिल्या त्या शेडची लांबी रुंदी, त्याचा दरवाजा कोणत्या दिशेला आहे हे मला सांगता येणार नाही. ज्या ठिकाणाहून आरोपीने तलवारी काढून दिल्या ती जागा त्या ठिकाणी इतर कोणीही सहज जावू शकेल अशी होती. मी जबाब देतेवेळी दि.२३.०९.२०२० रोजी मी तपास पथकात काम करीत होतो, तपास पथकामध्ये पो.स.ई. शेवाळे, पो.ना. गायकवाड, पो. कॉ. इथापे, इनामदार असे होते असे सांगितले होते. सदरचा मजकूर माझ्या जबाबामध्ये नाही त्याचे कारण मी सांगू शकत नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २३.०९.२०२० रोजी मी पोलीस ठाण्यात हजर असतांना पो.नि. ढेरे यांनी आम्हाला आरोपीचा फोटो दाखवला,पो.स.ई. शेवाळे यांनी दोन पंचांना

बोलावले व आम्ही पंचांसह आरोपीच्या घरी गेलो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही त्याच्या घरासमोर जावून त्याला आवाज दिला असता घरातून योगेश चावरे बाहेर आला, आम्ही त्याला फोटो दाखवून त्याबद्दल माहिती विचारली, तेव्हा त्याने सांगितले की,तो फोटो त्याचाच असून फोटोमधील पिस्टल हा गणेश उगले याचा परवानाधारक पिस्टल आहे, त्याला तलवारीबाबत विचारणा केली असता त्याने त्याच्या मालकीबाबत काहीही सांगितले नाही व सदरची तलवार त्याने त्याच्या शेडमध्ये ॲन्गलला खोचून ठेवल्याचे सांगितले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरीष्ठांच्या सांगण्यावरून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/-**

**(संध्या यु. सुळ)**

दिनांक-०६/०१/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),नेवासा